# पदभरती जाहिरात
## राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान
## महानगरपालिका,जळगाव

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान जळगाव शहर महानगरपालीका जळगाव अंतर्गत, राष्ट्रीय आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग अंतर्गत सेवा सुरु करण्याकरीता विविध संवर्गातील रिक्त वैद्यकिय अधिकारी (पुर्ण वेळ), वैद्यकीय अधिकारी (अर्ध वेळ) व इतर पदांची कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. सदर पदभरती जाहीरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणीक अर्हता, अनुभव, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती इत्यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान राज्य आरोग्य सोसायटी जळगाव www.jcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला आहे. सदर पदांकरीता अर्ज दि. 27/11/2025 रोजी पर्यंत सादर करावयाचे असुन सदर पदांच्या बाबतीत पुढील सर्व माहिति वरील वेबसाईट वरच प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच त्याकरिता कोणताही पत्र व्यवहार कार्यालया तर्फे उमेदवारास केला जाणार नाही, करिता जाहिरात प्रसिद्ध झाल्या पासुन अंतिम निवड होईपर्यंत सदर वेबसाईट पाहणे ही उमेदवारांची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीस्तव/-

मा.उपायुक्त

जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

| कंत्राटी पदभरती जाहीरात | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ व्या वित्त आयोग अंतर्गत महानगरपालिका जळगाव शहर | | | | | | | |
| करीता कंत्राटी रिक्त पदांकरिता जाहिरात | | | | | | | |
| अ.क्र | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण | वय मर्यादा | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | एकत्रित मानधन |
| १ | वैद्यकीय अधिकारी (पूर्ण वेळ ) १५ व्या वित्त आयोग | १५ | जळगाव शहर महानगरपालिका | ३८ वर्ष खुला प्रवर्ग व ४३ वर्ष राखीव प्रवर्ग (७० वर्ष सेवानिवृत्ती वैद्यकीय अधिकारी ) | M.B.B.S with MMC Reg | अजा-२<br>अज-१<br>भज-क-१<br>इमाव-४<br>एसईबीसी-१<br>ईडब्ल्यूएस-१<br>अराखीव-५ | 60000/- |
| २ | वैद्यकीय अधिकारी (पूर्ण वेळ ) राष्ट्रीय आरोग्य अभियान | ६ | जळगाव शहर महानगरपालिका | ३८ वर्ष खुला प्रवर्ग व ४३ वर्ष राखीव प्रवर्ग (७० वर्ष सेवानिवृत्ती वैद्यकीय अधिकारी ) | M.B.B.S with MMC Reg | अज-१<br>(विजाअ अथवा भजब अथवा भजक अथवा भजड अथवा विमाप्र)-१<br>इमाव-१<br>एसईबीसी-१<br>ईडब्ल्यूएस-१<br>अराखीव-१ | 60000/- |
| ३ | वैद्यकीय अधिकारी (अर्ध वेळ ) राष्ट्रीय आरोग्य अभियान | २ | जळगाव शहर महानगरपालिका | उच्चतम वयोमर्यादा ७० वर्ष | M.B.B.S with MMC Reg | बिंदूनामावली लागू नाही | 30000/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक (Public Health Manegar) | २ | जळगाव शहर महानगरपालिका | ३८ वर्ष खुला प्रवर्ग व ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | MBBS or Any Medical Graduate (BAMS/BUMS/BHMS/BDS/B.P.TH/Nursing Basic/(P.B.Bsc)/B.Pharm + with MPH/MHA/MBA in Health Care Administration | अजा-१ अराखीव-१ | 32000/- |
| ५ | शहर गुणवत्ता आश्वासक (City Quality Assurance Coordinator) | १ | जळगाव शहर महानगरपालिका | ३८ वर्ष खुला प्रवर्ग व ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | Any Medical Graduate (MBBS/BAMS/BUMS/BHMS/BDS) with MPH/MHA/MBA in Health Care Administration | अराखीव-१ | 35000/- |
| ६ | कार्यक्रम सहहायक (Program Assistanat CQAC) | १ | जळगाव शहर महानगरपालिका | ३८ वर्ष खुला प्रवर्ग व ४३ वर्ष राखीव प्रवर्ग | Any Graduate with Typing | अराखीव-१ | 18000/- |

# कंत्राटी पदभरती जाहीरात

# राष्ट्रीय नागरी आरोग्य व १५ वा वित्त आयोग

# जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव

## अटी व शर्ती

१) जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे नियम लागू राहणार नाहीत. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्या संबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

२) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हे दाखल नसावे.

३) पदांसाठीचे वेतन हे एकत्रीत मानधन आहे. पदसंख्या , शैक्षणिक अर्हता, मानधन, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, आवश्यकतेनुसार बदलकरण्याचे सर्व अधिकार निवड समितीला असतील.

४) उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. निवड झालेल्या उमेदवारास सुरुवातीला ११ महिण्यांकरिता नेमणुक दिली जाईल. या कालावधीत केलेले काम समाधानकारक असल्यास नेमणुकीचा कालावधी वाढविण्याची शक्यता आहे. काम असमाधानकारक असल्यास कामावरुन कमी करण्यात येईल.

५) **वयोमर्यादा-**

- उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहीत वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील.
- अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास खुल्या व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील उमेदवाराचे वय १८ पेक्षा कमी नसावे.
- अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय ३८ पेक्षा जास्त नसावे व राखीव प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४३ पेक्षा जास्त नसावे व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना ५ वर्ष अधिक वयोमर्यादा राहील. त्याकरिता राष्ट्रीय
  आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत उमेदवारांना अनुभव प्रमाणपत्रामधे सद्यस्थितीत कार्यरत असल्याच्या बाबीचा उल्लेख असणे आवश्यक राहिल.
- सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी विशेषतज्ञ, एम.बी.बी.एस वैद्यकिय अधिकारी या पदाची वयोमर्यादा ७० वर्ष राहील.

- उमेदवारास २ किंवा त्यापेक्षा कमी अपत्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. २ पेक्षा जास्त अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसे प्रतिज्ञापत्र नमुना अ आपल्या स्वाक्षरीने जोडण्यात यावे.

६) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सील कडुन चालू कालावधीतील वैद्य असलेले नोंदणी प्रमाणपत्राची (Registration Certificate) छायांकीत प्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

७) मा.सहसंचालक(अतांत्रिक)रा.आ. मुंबई यांच पत्र क्र. राआसो/मनुष्यबळ/आरक्षण/२४५४६-७७४/१६ दि.२०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षीत संवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकिय अधिकारी पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.सदर पदातील उमेद्वार उपलब्ध झाल्यास नियुक्त उमेद्वारची नियुक्त आपोआप संपुष्टात येईल.

८) वैद्यकिय अधिकारी (पूर्ण वेळ) या पदांची थेट मुलाखत घेवुन पदे भरण्याकरिता खालील गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

- Subject Knowledge (10 Marks)
- Research & Academic Knowledge (10 Marks)
- Leadership Quality (10 Marks)
- Administrative Abilities (10 Marks)
- Experience (10 Marks)

a) For Government Experience – 2 Marks for one year

b) For Private Experience – 1 Marks for one Year

Total Experience - 10 Marks Maximum.

९) सदर जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील. केवळ त्याच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१०) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणांमध्ये बदल होऊ शकतो.भरती प्रक्रिया संबंधी सर्व अधिकार तसेच अर्ज स्विकारणे, नाकारणे अथवा भरती प्रक्रिया संपूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार, अध्यक्ष, निवड समिती यांनी राखुन ठेवले आहे.

११) एका पेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

१२) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१५०/- व राखिव प्रवर्गातील उमेदवारांनी रु.१००/- चा कोणत्याही राष्ट्रीयकृत (Nationalized)बॅंकेचा डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक आहे व डिमांड ड्राफ्ट च्या मागे स्वत:चे नाव स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांड ड्राफ्ट."CORPORATION INTEGRATED HEALTH AND FAMILY WALFARE SOCIETY JALGAON ACCOUNT" Punjab National Bank ACCOUNT No. 0222000100152722 या नावे येथे देय असलेला असावा.

१३) उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज दि. 20/11/2025 पासुन 27/11/2025 पर्यंत आवक जावक कक्ष दवाखाना विभाग, प्रमुख वैद्यकीय अधिकारी कार्यालय, शाहू हॉस्पिटल, शाहू नगर,जळगाव येथे, विहित वेळेत (स.११ वा ते सं.५ वा दरम्यान व शनिवारी स.११ ते १ वाजे पर्यंत) सादर करण्यात यावे.विहित कालावधी नंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच टपालाद्वारे विलंबाने प्राप्त अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

१४) शासकिय व निमशासकिय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. (टिप :- ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाचाच अनुभव असलेलास ग्राहय धरण्यात येईल.)

१५) मुलाखतीकरीता उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१६) जाहिरातीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक, गुणवत्ता आश्वासक व गुणवत्ता आश्वासक कार्यक्रम सह्हायक पदाकरीता पात्र उमेदवारांची अंतिम निवडीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन करण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying examमधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proportionकाढण्यात येईल. (उदा. ६०%गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proportion =६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता विचारात घेण्यात येईल.) | अधिकतम २० गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाण proportionकाढण्यात येईल.<br>(उदा. १. Staff Nurseपदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc(Nursig)हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारासB.Sc(Nursig)च्या अंतिम वर्षात ६०%गुण प्राप्त असल्यास त्याचे २०%प्रमाणेproportion=६०*२०/१००=१२गुण) | २० गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण प्रमाणे.<br>(१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | **एकूण** | **१०० गुण** |

| | | एकूण | १०० गुण |
|---|---|---|---|

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.१५ वित्त आयोग अंतर्गत निवड होणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांना सुरु होणाऱ्या आरोग्यवर्धिनी केंद्रांच्या संख्येनुसार गुणांकन यादी प्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील.

**विहीत नमुन्यातील अर्जासोबतः-**

- वयाचा पुरावा
- पदवी/पदवीका शेवटच्या वर्षाची प्रमाणपत्र (टिपः सर्व वर्षाचे प्रमाणपत्र सादर करु नये)
- गुणपत्रिका
- कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable)
- शासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र.

वरील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडण्यात याव्यात व तसेच पडताळणीसाठी मुळ कागदपत्रे सोबत ठेवावीत.

१८) अर्जासोबत सादर केलेल्या छायांकित प्रत व मुळ दस्ताएवेज यांचेमध्ये तफावत आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास उमेदवारांची निवड रदद् करण्यात येईल याची नोद घ्यावी. उमेदवाराकडुन अर्धवट अपुर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज किंवा अस्पष्ट प्रति असल्यास संबंधीत उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी ही उमेदवाराची राहिल.

१९) पदभरती संबंधीत सर्व माहिती सुचना व तत्सम www.jcmc.gov.in या Website वरच प्रकाशित करण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही. यास्तव सदर Website वरील सुचना इत्यादि बाबत पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२०) उमेदवाराची निवड झाल्यावर संबंधित महानगरपालिकेचे अधिकारी यांचे सोबत रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा भरुन देणे बंधणकारक राहील.

२१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना सदर पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व तसेच परवानगी पत्र सदर अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील, तसेच परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२२) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

२३) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे. अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्रधान्य देण्यात येईल.

२४) ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे.त्या पदांकरिता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची मुख्यालयस्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल.

२५) पदभरतीच्या अनुषंगाने उमेदवारांशी संबंधित सर्व सूचना इत्यादी वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

२६) एकूण पदांच्या ५०% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

२७) केंद्र अथवा राज्य शासनाकडुन संबंधीत पद नामंजुर झाल्यास उमेदवारास कोणतीही पूर्व सुचना न देता संबंधीत उमेदवाराची सेवा तात्काळ संपूष्टात येईल.

वैद्यकिय आरोग्य अधिकारी(निवड समिती सदस्य)
जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

मा. उपायुक्त (निवड समिती सदस्य)
जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ वा वित्त आयोग
## जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव
## कंत्राटी पदभरती
## अर्जाचा नमुना

................................ या पदासाठी अर्ज

**प्रती,**

मा.अध्यक्ष,**(निवड समिती) तथा**
आयुक्त, जळगाव महानगरपालिका,
जळगाव.

१) उमेदवाराचे नाव :-

मराठी मध्ये (संपुर्ण नाव) :- ............................................................

इंग्रजी मध्ये (संपुर्ण नाव) :- ............................................................

२) उमेदवाराचा संपुर्ण पत्ता :- ............................................................

............................................................

..................................पिन कोड..................

३) दुरध्वनी क्र :- ......................, ईमेल आयडी ....................................

४) जन्मतारीख :- ......................, दि. /०६/२०२३ रोजीचे वयः-....वर्ष....महिने

५) जातीचा प्रवर्ग :- ................... , पोटजात ................

६) शैक्षणिक अर्हता:-

| अ.क्र | परिक्षेचे नाव | विद्यापिठ/मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(*पदांच्या शैक्षणिक अर्हते नुसार व उच्च शैक्षणिक अर्हतेनुसार सर्व गुणपत्रक/प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत सोबत जोडणेआवश्यक)

७) अनुभव :-

| अ.क्र | संस्थेचे नाव व पत्ता | पदाचे नाव | शासकिय | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासुन | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(* अनुभव प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक) (*प्रमाणपत्राच्या छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक)

८) अर्जासोबत खालील (छायांकित) प्रती जोडण्यात आलेल्या आहे. :-

(१) ........................................................

(२) ........................................................

(३) ........................................................

(४) ........................................................

(५) ........................................................

(६) ........................................................

उपरोक्त प्रमाणे मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती हि खरी असुन, ती खोटी आढल्यास माझी उमेदवारी नियुक्तिच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

उमेदवाराची स्वाक्षरी

नाव..............................

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये

## प्रतिज्ञापत्र

## नमुना-अ

## (नियम ४ पहा)

मी,श्री/श्रीमती/कुमारी———————————————श्री————————

————————————यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ——————— वर्ष राहणार ——————————————————— या व्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/ करते की मी —————— या पदाकरीता आपल्या येथे अर्ज सादर केलेला आहे.

आज रोजी मला ——————— इतकी हयात अपत्य आहेत त्यापैकी २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या ————आहे. हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे या पदासाठी मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे.

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**ठिकाण :-**
**दिनांक :-**